क्र. राआपोम/आस्था/6514 /२०२१
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
डॉ.ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई - ४०० ०१८
दिनांक : 04 SEP 2021

## पाहिजेत

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर ३६४ दिवसांचे कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| विषय | प्राध्यापक | विषय | सहयोगी प्राध्यापक | |
|---|---|---|---|---|
| | रिक्त पदे | | रिक्त पदे | |
| | खुला प्रवर्ग | | खुला प्रवर्ग | आरक्षण अनुसुचित जाती |
| शरीर क्रिया | १ | संस्कृत संहिता | १ | --- |
| रसशास्त्र | १ | शरीर रचना (2) | १ | १ |
| अगदतंत्र | १ | शरीर क्रिया | १ | --- |
| शालाक्यतंत्र | १ | द्रव्यगुण | १ | --- |
| कौमारभृत्य | १ | अगदतंत्र | १ | --- |
| शरीर रचना | १ | स्वस्थवृत्त | १ | ---- |
| एकुण | ६ | एकुण | ६ | १ |

srgest/sanjay-1/Adertisement contract

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | किमान वयोमर्यादा ६२ वर्षांपर्यंत |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br><br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br><br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br><br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | शैक्षणिक अर्हतेमधील (१) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित आयुर्वेदिक विषयाचा सहयोगी प्राध्यापक या पदाचा पाच वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव.<br><br>प्राध्यापक या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |

| | |
|---|---|
| पदनाम | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | किमान वयोमर्यादा ६२ वर्षांपर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br><br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br><br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br><br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | शैक्षणिक अर्हतेमधील (१) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित आयुर्वेदिक विषयाचा सहाय्यक प्राध्यापक या पदाचा पाच वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव. |
| मानधन | प्रतिमाह रु.४०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |